File No.PBN-18021(11)/53/2019-PBN-DPO-COLLECTOR OFFICE-PARBHANI

# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

संदर्भ - 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे आदेश क्र. जिवायो- 1007/प्र.क्र.39/का-1444, दि.16/02/2008
2. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग यांचे शासन निर्णय क्र.एमएलके 2010/प्र.क्र.413/पदुम-8, दि.24.10.2010
3. या कार्यायाचे प्रशासकीय मान्यता आदेश क्रं. जिनिस/जिवायो-18-19/दुग्धव्यवसाय/नि.वि./का.क्र.1/02, दि.2.1.2019
4. जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, परभणी यांचे निधी मागणी पत्र क्र.जिदुविअ/परभणी/तांत्रिक/2019/196, दि.06.03.2019

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/ दुग्धव्यवसाय /नि.वि./का.क्र.1/ 730

दि. 8 मार्च, 2019

## जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018 -19 अंतर्गत निधी वितरण आदेश

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 अंतर्गत **'एकात्मिक दुग्धव्यवसाय विकास कार्यक्रम'** या योजनेसाठी रु.20.00 लक्ष तरतूद मंजूर असुन संदर्भ क्रं 2 अन्वये रु.18.30 लक्षाची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, परभणी यांचेकडून संदर्भ 4 अन्वये खालील परिशिष्टात दर्शविलेल्या कामांचे आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावर सदर काम निविदा स्तरावर प्रक्रिया राबविण्यात येत असुन मंजूर निविदेप्रमाणे रु.16.73 लक्षाची मागणी केलेली आहे. त्यास अधिन राहून व उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालीलप्रमाणे एकुण **रु.16.73 लक्ष (अक्षरी रुपये सोळा लक्ष त्र्याहत्तर हजार फक्त)** चे निधी वितरण करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ.क्र. | योजनेचे नाव | मंजुर तरतूद | प्रशासकीय मान्यता रक्कम | या आदेशान्वये वितरित निधी | लेखाशिर्ष नियोजन विभाग मागणी क्र.ओ - 50 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | **जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, परभणी** | | | | |
| 1 | **'एकात्मिक दुग्धव्यवसाय विकास कार्यक्रमातंर्गत** | 20.00 | | | 2404 3939 - दुग्धव्यवसाय विकास<br>(00) 195 सहकारी संस्थांना सहाय्य<br>(49) जिल्हा योजना - परभणी<br>(49) (01) 'एकात्मिक दुग्धव्यवसाय विकास कार्यक्रम' (2402 3939)<br>31 - सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) |
| 1 | शासकीय दूध शितकरण केंद्र, पाथरी येथे चिलींग प्लॅट उभारणी व कार्यान्वित करणे | | 18.30 | **16.73** | |
| | **एकुण** | **20.00** | **18.30** | **16.73** | |

**(अक्षरी रुपये सोळा लक्ष त्र्याहत्तर हजार फक्त)**

## अटी व शर्ती

1. सदर सुरु करण्यापूर्वी आपल्या विभागाच्या शासन निर्णयानुसारच व प्रचलीत विहीत मार्गदर्शक सुचनांनुसार सदर कामाबाबत अनुज्ञेयता तपासूनच कार्यवाही करावी.
2. या कामासाठी आवश्यक असलेल्या तांत्रीक बाबीची तसेच शासनाने ठरवून दिलेल्या निकषाची पुर्तता करण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील. योजनानिहाय वितरीत केलेल्या निधीच्या मर्यादेतच खर्च करावे. वितरीत केलेल्या निधीपेक्षा जादा खर्च केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
3. या आदेशान्वये वितरित करण्यात आलेला निधी चालु आर्थिक वर्ष 2018-19 अखेरीस अखर्चित राहिल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिका-यांची राहील.
4. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी मंजुर करण्यात आलेला आहे त्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा, इतर कोणत्याही योजनांवर/कामावर खर्च करण्यात येवू नये.

5. या योजनेसाठी आवश्यक असलेली तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मान्यता सक्षम प्राधिका-यांकडुन घेतल्यानंतरच निधी खर्च करण्यात यावा. सदरील मंजुरी घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिका-यांची राहील या अटीवरच निधी वितरित करण्यात येत आहे.
6. सदरील अर्थसहाय्याची उपयोगिता प्रमाणपत्रे व पुर्णत्वाचे दाखले महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास दयावी. तसेच या योजनांवर झालेल्या खर्चाचे महालेखापाल यांचे कार्यालयात नोंद झालेल्या खर्चाशी ताळमेळ घालुन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.
7. सदरील योजनेचा त्रयस्थ यंत्रणेकडुन मुल्यमापन करण्यात येवु शकते तेव्हा या योजनेतंर्गत होणा-या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि दरमहा 5 तारखेपुर्वी या कार्यालयास प्रगती अहवाल सादर करावा.
8. आवश्यक असलेल्या कामाबाबत निविदा मागविणे, स्विकृत करणे तसेच खरेदीबाबतचे सर्व अधिकार प्रचलित पध्दतीनुसार राहतील.
9. योजनेच्या अंमलबजावणीवर, खर्च व तांत्रिक बाबींवर संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे नियंत्रण राहील.
10. या योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज इ. बाबीसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.
11. या आदेशान्वये वितरित करण्यात आलेल्या निधीचा खर्च वरीलप्रमाणे योजनेच्या स्तंभ क्र.6 मध्ये दिलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

प्रति,

जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,
परभणी

-स्वा-

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
1. महालेखापाल, नागपूर - 2
2. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

Signature valid

Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.03.08 1?:08:42 IST
Reason: Approved